पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/02/2020 (बुधवार)
(दुपार)

---

## आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. नरखेड :— पो.स्टे. नरखेड दिनांक 13/09/2016 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. 112/2016 कलम 354, 354 (ब), 376 (2) (आय) (एन), भादवी सहकलम 4, 6, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 13/09/2016 चे 11.30 वा. दरम्यान 13 वर्षीय पिडीत/ फिर्यादी ही घरी असताना आरोपी नामे — महेश मारोतराव चरपे, वय 32 वर्ष, रा. मसोरा, ता. नरखेड जि. नागपूर याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 13/09/2016 चे 21.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. गजानन चेके, पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक 18/02/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 7, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 3 वर्ष सश्रम कारावास व 2,000/—रु. दंड व दंड न भरल्यास 4 महिने साधी शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. माधुरी मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात कर्मचारी सहा.फौज. श्री. अरूण भुरे, श्री. राजेंद्र वानखेडे, पोहवा श्री. शेखर मेश्राम, श्री. मधुकर आदमने यांनी मदत केली आहे.

## फसवणुक

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 5 कि मी अंतरावर परसोडी उमरेड स्टेट बॅक ऑफ इंडीया एटीएम येथे दिनांक 12/02/2020 चे 15.00 वा. ते 15.15 वा. पर्यंत फिर्यादी नामे— राजेन्द्र वामनराव ठाकुर, वय 49 वर्ष, रा. वाठोडा रोड, श्रीकृष्ण नगर यांचा स्टेट बॅक ऑफ इंडीयाचे खातेदारक आहेत. फिर्यादी हे एसीबीआयच्या एटीएममधून पैसे काढत असताना 25 ते 28 वयोगटातील अज्ञात आरोपी हा एटीएम रुममध्ये आला. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या एटीएम खात्याचे पीनकोडची माहिती घेत हातचालाखीने फिर्यादींचे एटीएम हस्तगत केले. यानंतर आरोपीने एटीएमव्दारे फिर्यादींच्या खात्यातील 10,000/—रू. काढून घेत फिर्यादींची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार धुर्वे 9823936457 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कुही :– दि. 18/02/2020 चे 14:00 वा. चे सुमारास 17 वर्षीय पीडित/फिर्यादी ही महाविद्यालयातून पेपर सोडवून बाहेर आली असता आरोपी नामे– विजय तुकाराम निपाने, वय 28 वर्ष, रा. मांढळ याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसे पीडिता ओरडली असता पीडितेची सासु आली व आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने पिडीतेच्या सासुला चावा घेतला व ढकलढुकल करून पळ काढला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ) (1), 323 भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि शुभांगी तकीत 8766934595 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर